सामाजिक क्षेत्रातदेखील भट्टारकरत्न स्वस्तिश्री लक्ष्मीसेन महाराज यांनी आपला ठसा उमटविला आहे. समाजामध्ये एकोपा टिकविणे, समाजाच्या सर्व थरांतील लोकांशी संपर्क ठेवणे, त्यांच्या सद्‌वर्तनाला प्रोत्साहन देणे आणि विशेषत: काही कारणांनी मार्ग चुकलेल्यांना शुध्द करू न घेणे यांसारखी उपयुक्त कार्ये त्यांनी सातत्याने चालू ठेवली आहेत. तसेच समाजातील कार्यकर्त्यांच्या सेवाकार्यांचा गौरव करण्यससाठी त्यांनी ' समाजभूषण ' ही पदवी कार्यकर्त्यांना द्यावयाचा चांगला उपक्रम सुरु केला असून आजवर १०० पेक्षा जास्त सामाजिक कार्यकर्त्यांना ही पदवी देऊन त्यांचा सार्थ गौरव करण्यात आला आहे.

धार्मिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांप्रमाणे जेन साहित्याच्या क्षेत्रातसुध्दा भट्टारकरत्न स्वस्तिश्री लक्ष्मीसेन महाराज यांनी विधायक स्वरू पाचे व दूरपरिणामी असे उल्लेखनीय कार्य केले आहे. या कार्यांचा विशेष आविष्कार म्हणजे त्यांनी परिश्रमपूर्वक चालविलेली ' श्री लक्ष्मीसेन दिगंबर जैन ग्रंथमाला ' ही होय. सन १९३७ साली स्थापन झालेल्या या ग्रंथमालेत भट्टारकरत्न लक्ष्मीसेन महाराज पीठावर येण्यापूर्वी फक्त ४ ग्रंथ प्रसिध्द झाले होते. यामध्ये स्वत: च्या प्रयत्नांनी ४६ ग्रंथांची भर घालून त्यांनी ग्रंथामालेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षापर्यंत ५० ग्रंथ प्रसिध्द करण्याचे उल्लेखनीय कार्य करू न दाखविले आहे. या ग्रंथमालेतर्फे चरित्रे, नीतिकथा, पूजाविधी, स्तोत्रे आदी विषयांवर संस्कृत, मराठी, कन्नड व तमिळ अशा चार भाषांतून प्रसिध्द झालेल्या विविध ग्रंथांच्या पाऊण लाखांच्यावर प्रती महाराष्ट्र व कर्नाटकातील जैनांच्या घरात पोहोचल्या आहेत. तसेच या ग्रंथमालेच्या प्रकाशनामध्ये ' योग विचार, ' ' उपदेशरत्नमाला, ' ' कुंथलगिरी माहात्म्या, ' ' श्रावकाचार ' ' पुरुषार्थ सिध्दयुपाय ' यांसारख्या अभिजात ग्रंथांचा समावेश करण्यात आला आहे, ही मोठी अभिमानास्पद गोष्ट होय. विशेष म्हणजे मराठी जैन साहित्याची सर्वतोपरी अभिवृध्दी करण्यासाठी भट्टारकरत्न स्वस्तिश्री लक्ष्मीसेन महाराज यांनी श्रुतपंचमीच्या शुभमुहूर्तावर दि. ४ जून, १९८४ रोजी ' महाराष्ट्र जैन साहित्य परिषद, ' या स्वतंत्र साहित्य संस्थेची करवीरच्या मठात मोठ्या समारंभपूर्वक स्थापना केली. त्यांच्याच अध्यक्षतेखाली परिषदेच्या वतीने पहिले मराठी जेन साहित्य संमेलन कोल्हापूर इथे दि. १२, १३ जून, १९८६ रोजी पार पडले आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रेरणेनुसार दुसरे संमेलन १९८७ साली सोलापूर इथे, तिसरे संमेलन १९८८ साली पुणे इथे आणि चौथे संमेलन १९८९ साली निपाणी इथे साजरे

झाल्याने ' मराठी जैन साहित्य संमेलन भरविण्याची नवीन प्रथा प्रस्थापित झाली आहे.

अशा रीतीने श्री लक्ष्मीसेन जैन मठाने आधुनिक काळाला अनुसरू न अशी विधायक कार्ये धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक व वाङ्मयीन क्षेत्रांत यशस्वीपणे व सातत्याने पार पाडून प्रगतीपर वाटचाल केली आहे. ही प्रगती अशीच चालू राहून मठाच्यावतीने भावी काळातदेखील पथदर्शक स्वरू पाचे भरीव कार्य निरंतरपणे होत राहो, ही शुभेच्छा !

## शाहूपुरी जिनमंदिराची
## महनीय कामगिरी

जैनांचे अतिशय क्षेत्र म्हणून प्रसिध्द असलेल्या पवित्र करवीर नगरीच्या शाहूपुरीतील ' श्री १००८ भगवान नेमिनाथ दिगंबर जिनमंदिर ' या ख्यातनाम मंदिराचा हीरक महोत्सव अतीव उत्साहाच्या साजरा होत आहे, ही मोठी आनंदाची व अभिमानाची घटना होय. तसेच या मंगल प्रसंगाच्या निमित्ताने ' हीरक महोत्सव स्मरणिका ' प्रसिध्द होत आहे, ही खास समाधानाची गोष्ट होय; कारण या स्मरणिका ग्रंथामुळे प्रथमच शाहूपूरी दिगंबर जिनमंदिराचा व तदनुषंगाने त्या भागातील दिगंबर जैन समाजाचा इतिहास, थोड्या प्रमाणात हा होईना, पण प्रथमच प्रकाशात येत आहे. या इतिहासावरू न शाहूपुरीतील भ. नेमिनाथ दिगंबर जिनमंदिराला कोल्हापुरातीलच नव्हे तर दक्षिण महाराष्ट्रातील दिगंबर जैन समाजामध्ये महत्त्वाचे व वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे आणि त्याचा या प्रादेशिक विभागातील इतर समाजावरदेखील चांगला परिणाम होत आहे. हे स्पष्टपणे प्रत्ययास येते. साहजिकच या मंदिराशी संबंधित असलेले नेते, कार्यकर्ते, श्रावक व श्राविका यांनी आपली दृढ धर्मश्रध्दा, आचारप्रवणता व उपक्रमशीलता यांच्या बळावर आणि अविरतपणे आजतागायत केलेल्या परिश्रमाच्या साहाय्याने विविध स्वरू पाची महनीय कामगिरी करू न व तिची परंपरा सातत्याते टिकवून हे आदाराचे व मानाचे स्थान मिळविले आहे.

### मंदिराची निर्मिती

करवीरच्या जैन समाजाने मोठी दूरदृष्टी ठेवून मंदिराची निर्मिती केली म्हणून त्याला धन्यवाद द्यावेत तेवढे थोडे आहेत. राजर्षी छ. शाहू महाराजांनी दि. १५ फेब्रुवारी, १८९६ रोजी एक विशेष जाहीरनामा काढून ' शाहूपूरी ' ही नवी व्यापारी व निवासी वसाहत स्थापन करण्याचे जाहीर केले आणि आपल्या प्रजाजनांना वसाहतीत जागा घेण्याचे आवाहन केले. त्यानुसार १८९८ साली स्थापन झालेल्या शाहूपुरी या व्यापारी वसाहतीत जैनांनी स्वत: साठी जागा घेतल्या. एवढेच नव्हे तर दिगंबर जिनमंदिरासाठी म्हणून खास स्वतंत्र जागा १९०२ साली विकत घेतली. तिथे श्री

देवेंद्रप्पा डुणुंग यांनी दिलेली एक मूर्ती ठेवून मंदिराचा शुभारंभ केला व थोड्याच अवधीत मंदिराच्या बांधकामास सुरुवातदेखील केली; परंतु १९१४ साली मंदिराच्या गर्भगृहाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर कॉंट्रॅक्टरशी झालेल्या वादाने कोर्टकचेरी करावी लागल्याने बंद पडलेले बांधकाम १९२२ साली परत जोमाने सुरू करण्यात आले व ते १९२६ साली पूर्ण करण्यात आले. अशा रीतीने पाव शतकाच्या कालावधीनंतर अत्यंत चिकाटीने मंदिराची निर्मिती झाली, हे समाजाला भूषणावह होय.

मंदिरातील मूर्तीचा प्रतिष्ठापना

या मंदिराच्या नवीन वास्तुत चोवीस तीर्थकरांच्या मूर्तीपैकीं त्या मानाने फारशा प्रचलित नसलेल्या तीर्थकर भगवान नेमिनाथ यांची काळ्या पाषाणाची, भद्र परिणामी, मनोज्ञ व विशाल मूर्ती स्थापन करण्यात आली आणि तिचा प्रतिष्ठापना समारोह अतिशय वैभवात व भव्य प्रमाणात १९२७ साली साजरा करण्यात आला, ही विशेष उल्लेखनीय घटना होय; कारण पंचकल्याणक पूजा थोर तपस्वी आचार्य श्री शांतिसागर महाराज यांच्या मंगलमय सान्निध्यात आणि ज्येष्ठ भट्टारक पट्टाचार्य श्री लक्ष्मीसेन महाराज यांच्या कुशल अधिपत्याखाली संपन्न झाली. तसेच, या पूजेला करवीरचे छत्रपती व मौलिक मार्गदर्शन यांचा अपूर्व लाभ उपलब्ध झाला होता. शिवाय या पूजेला जोडूनच दक्षिण महाराष्ट्र जेन सभेचे २९ वे अधिवेशन जैन समाजाचे श्रेष्ठ विचारवंत व लेखक ब्र. शीतलप्रसादजी, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली आणि अनेक मान्यवर कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत भरले होते. साहजिकच या सर्व गोष्टींमुळे मंदिराचा प्रतिष्ठापना समारोह फार प्रभावशाली झाला आणि त्यामुळे जैन समाजाचा प्रतिष्ठा बरीच वाढली.

मंदिरातील नित्य - नैमित्तिक विधी

मंदिरातील नित्य व नैमित्तिक विधी दिगंबर जैन आन्मायपध्दतीनुसार शास्त्रशुध्द रीतीने, प्रसन्न वातावरणात व काटेकोरपणे पार पाडले जातात हे विशेष होय. अष्टद्रव्य पूजा, पंचामृत अभिषेक, शास्त्रवाचन, आरती आदी नित्य क्रिया आणि नोपी, उद्यापन, विधान आदी नैमित्तिक क्रिया मोठ्या भक्तिभावाने आणि पुष्कळ श्रावकांच्या उपस्थितीत करण्याची परंपरा या मंदिराने प्रस्थापित केली आहे. तसेच महावीर जयंती, श्रृतपंचमी, रक्षाबंधन, महावीर निर्वाण आदी पर्व उत्साहपूर्वक साजरे करण्याची प्रथा या मंदिराने सातत्याने चालू ठेवली आहे. हे सर्व विधी नियमानुसार व

जबाबदारीच्या जाणिवेने पार पाडण्याचे अवघड कार्य १९२७ सालापासून एकाच उपाध्ये घराण्यातील श्री. केशव दऱ्याप्पा यांची पहिली पिढी, श्री. इंद्रजित व वसंतराव यांची दुसरी पिढी अविरतपणे व तन्मयतेने पार पाडीत आहे, ही खास भाग्याची गोष्ट होय.

पर्युषणपर्व व रथयात्रा महोत्सव

जैनांचा पर्वराज म्हणून ओळखला जाणारा दशलक्षण किंवा पर्युषणपर्व सामुदायिक स्वरुपात व अत्यंत प्रभावक रीतीने साजरा करण्याची पथा हे या मंदिराचे खास वैशिष्टय होय. या पर्वाच्या दहा दिवसांत सकाळी मोठा अभिषेक व तत्वार्थसूत्र वाचन, दुपारी विविध पूजा व विधाने सायंकाळी शास्त्रवाचन आणि रात्री कीर्तन, प्रवचन वा गायन असा भरगच्च कार्यक्रम आखलेला असतो. तसेच या कालावधीत महिला परिषद भरविली जाते व स्त्रियांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. विशेष म्हणजे या पर्वाला सार्वजनिक स्वरुप देण्यात येऊन भाद्रपद शुद्ध अष्टमीच्या पवित्र दिवशी करवीर संस्थानात सरकारी फर्मानानुसार सार्वजनिक सुट्टी देण्यात येत असे आणि त्या दिवशी जीवदया जास्तीत जास्त प्रमाणात पाळण्याचे प्रयत्न सर्व जनतेकडून करण्यात येत असते. शिवाय त्या दिवशी मंदिरातर्फे निघण्ा-या भगवंताच्या पालखीबरोबर हत्ती, घोडे, उंट आदींचा दोन नंबरचा संस्थानी लवाजमा देण्याची तरतूद करवीर सरकारतर्फे करण्यात येत असे.त्यामुळे मंदिराच्या वैभवात व प्रतिष्ठेत बरीच भर पडत असे. करबीर संस्थान विलीन होईपर्यत हा सरकारी लवाजमा हमखास मिळत असे. पुढे १९६६ साली आचार्यरत्न देशभूषण महाराज यांच्या आर्शीर्वादाने जयपूरहून मंदिराला भेट म्हणून मिळालेला चांदीचा विशाल आकर्षक रथ पालखीबरोबर नेण्याची प्रथा सुरु झाली. दक्षिण महाराष्ट्रात अशा त-हेचा हा एकमेव रथ असल्याने वैभवशाली रीतीने व असंख्य श्रावक-श्राविकांच्या समवेत शिस्तबद्ध पद्धतीने करबीर नगरात निघण्ारी ही रथयात्रा करबीरचे भूषण समजली जाते. साहिजिकच ही रथयात्रा जैन समाजाची प्रतिष्ठेची बाब झाली आहे.

पूज्य आचार्य व साधू-साध्वींचे वास्तव्य

या मंदिरात साधू व साध्वीयांचे वास्तव्य होत आले आहे आणि त्यांच्या उपदेशाचा अपूर्व लाभ येथील श्रावकांना निरंतरपणे मिळत आहे, हे त्यांचे अहोभाग्य होय. या मंदिरात १९३३

साली आचार्य शांतीसागर महाराज यांचा हीरक महोत्सव मोठया भक्तिभावाने साजरा करण्यात आला, तसेच आचार्यरत्न देशभूषण, आचार्य विमलसागर व आचार्य संभव सागर यांसारखे श्रेष्ठ आचार्य व अन्य साधू-साध्वी यांचे चातुर्मास कालीन वास्तव्य या मंदिरात झाले. शिवाय बरेच आचार्य व आर्यिका यांचे केशलोच समारंभदेखील या मंदिरात पार पडले. विशेष म्हणजे १९८० साली राष्ट्रसंत एकाचार्य विद्यानंद मूनिमहाराज यांचे ८ दिवस वास्तव्य या मंदिरात होते, त्या वेळी या मंदिर परिसराला समवसरणाचे स्वरुप प्राप्त झाले होते.

विशेष घटना

या मंदिरात अनेक उल्लेखनीय व प्रभावक घटना घडल्या, हे विशेष होय. या मंदिरात कीर्तनसम्राट तात्यासाहेब चोपडे, श्री. गणपतराव संघई व श्री. चंदूलाल कटके यांसारख्या मान्यताप्राप्त कीर्तनकारांची सुश्राव्य कीर्तने झाली आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जैनविद्यातज्ज्ञ डॉ. आ. ने. उपाध्ये व डॉ. विलास संगवे, ज्येष्ठ पत्रकार सत्यवादीकार पाठील, श्रेष्ठ समाजनेते श्री. शांतीनाथ पाटणे व भट्टारक स्वस्तिश्री लक्ष्मीसेन महाराज यांचे भावपूर्ण सत्कार या मंदिरातर्फे करण्यात आले. शिवाय, १९७२ साली दहा दिवसांचे धार्मिक शिबीर घेण्यात आले आणि १९६५ व १९८१ साली सिद्वचक्रविधान, १०८७ साली गणधरवलयविधान व १९८८ साली इंद्रध्वजविधान यांसारखी मोठमोठी विधाने समरंभपूर्वक करण्यातआली. त्याच धर्तीवर १९८७ साली मानस्तंभावरील चतुर्मुख जिनबिंबाचा महाभिषेकोत्सव मोठया प्रमाणात आली, १९६६६साली चांदीच्या रथासाठी मोठी खोली बांधण्यात आली आणि १९८५ साली विशाल सभागृह व अतिथिनिवासाची सोय असलेले प्रशस्त कुष्मांडिनी भवन निर्माण करण्यात आले. विशैष म्हणजे १९७४-७५साली भगवान महावीर २५००निर्वाण-महोत्सव वर्षात कोल्हापुरातील समस्त जैन समाजच्या वतीने अत्यंत भव्य व उदात्त स्वरुपात आणि अभूतपूर्व प्रमाणावर साज-या करण्यात आलेल्या विविध समारंभामध्ये या मंदिराने सिंहाचा वाटा उचलुन केले मार्गदर्शनाचे व विधायक स्वरुपाचे कार्य अत्यंत स्पृहणीय व अभिमानास्पद होते.

अशा रीतीने गेल्या आठ वषाच्या कालखंडात या मंदिराने धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात महनीय कामगिरी सातत्याने करुन दाखविली आहे आणि अशाच त-हेचे प्रभावक कार्य करण्याची परंपरा या पु ढेही अशीच अखंडितपणे चालु राहील, असा विश्वास

करण्याची निर्माण केला आहे. या मंदिराच्या परिसरात नविन  बांधकाम करावे, पाठशाला परत सुरु करावी, पंडितांच्या प्रशिक्षण्ांची सोय करावी, सर्वासाठी आयुर्वेदिक दवाखाना काढावा, अशा विविध उपयुक्त योजना शक्यतो लवकर कार्यान्वित कराव्यात, असा मंदिराच्या विश्वस्तांचा व कार्यकर्त्याचा संकल्प आहे. त्यांचा हा संकल्प लवकर पुरा होईल, अशी आशा आहे. त्यांबरोबर या मंदिर सथेचे हस्तलिखित व जुने जैन ग्रंथ संग्रहित करणे, ग्रंथालाची व्यवस्था करणे, वाचनालयाची सोय करणे, जैन साहित्याचे संशोधन, संरक्षण् प्रकाशन, संवर्धन व वितरण करणे यांसारखी आवश्यक अशी जैन साहित्यविषयक कार्ये अगक्रमाने हाती घेतल्यास फार बरे होईल असे वाटते. या सर्व गोष्टीमुळे या मंदिराने संपादित केलेला दिगंबर जैनांचे सांस्कृतिक केंद्र  हा लौकिक याहूनजास्त वाढेल, अशी खात्री वाटते.

## विभाग ४

## जैन आचार्य: समंतभद्र व विद्यानंद

२८) दक्षिणेतील जैनाचार्य स्वामी समंतभद्र

२९) दिगंबर जैन मुनींचे कार्य:एक दृष्टिक्षेप

३०) एलाचार्य श्री विद्यानंद महाराज:

एक क्रांतिकारी व्यक्तिमत्व

३१) एलाचार्य मुनिश्री विद्यानंद : साधू जीवनाचा आलेख

३२) सर्वतोभद्र गुरुदेव समंतभद्र

॰ २८ ॰

### दक्षिणेतील जैनाचार्य : स्वामी समंतभद्र

(भगवान महावीर २५००व्या निर्वाण महोत्सव वर्षानिमित्त पुणे नभोवाणी केंद्रातर्फे सांगली-परभणी-नागपुर केंद्रासह) दक्षिणेतील जैनाचार्य या विषयावर प्रथितयश विद्वानांची एक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. प्रस्तुत व्याख्यानमालेचे वरील पुष्पदि. ८ एप्रिल, १९७५रोजी डॉ. विलास संगवे यांनी गोवले ते सन्मति च्या वाचकांसाठी नभोवाणी केंद्राच्या अनुमतीने इथे देत आहेत, -संपादक )

जैनांची आचार्यपरंपरा फार पुरातन कालापासून दक्षिण भारतात सतत चात आली असून या आचार्यपरंपरेने धार्मिक, नैतिक, साहित्यिक, शैक्षणिक आदी विविध क्षेत्रांत फार मोलाची कामगिरी केली आहे. भारतीय संस्कृती सर्वार्थाने समृद्व करण्याचे व तिचे लोण सामान्य जनतेपर्यंत पोहाचविण्याचे महत्वपूर्ण कार्य जैनाच्या आचार्यपरंपरेने दक्षिण भारतात इसवी सनापूर्वी तिस-या शतकापासून आजतागायत अव्याहतपणे चालू ठेवले आहे. अशा कर्तृत्वशाली आचार्यपरंपरेच्या सुरुवातीच्या कालातील एक महनीय आचार्य म्हणून स्वामी समंतभद्र यांचे नाव मशहूर आहे. तसेच एक प्रतिभाशालील कवी, तार्किक विद्वान, प्रभावी धर्मप्रसारक व कुशल वादविवादपटू म्हणूनदेखील स्वामीसमंतभद्र प्रसिद्व आहेत.

अशा प्रथितशय समंतभद्रासंबंधीची वैयक्तिक माहिती मात्र अत्यंत थोडी उपलब्ध आहे. त्याचा जन्म इसवी सनाच्या दुस-या शतकाच्या उत्तरार्धात एका क्षत्रिय राजकुलात झाला. त्यांचे

मूळ नाव शांतिवर्मा असे होते.  त्यांचे वडील दक्षिण भारतातील फणिमंडळ विभागातील उरगपूर राज्याचे राजे होते. उरगपूर हे शहर चोल राजांची प्राचीन राजधानी म्हणून प्रसिद्व होते. कावेरीच्या तीरावर वसलेले हे शहर एक सांस्कृतिक केंद्र म्हणूनदेखील प्रसिद्व होते.  या उरगपूर परिसरातच समंतभद्राचे बालपण व गृहस्थजीवन व्यतीत झाले असले पाहिजे.  त्यांचे शिक्षण, त्यांचे गुरु, त्यांचा विवाह इत्यादी वाबींविषयी कसलीच माहिती मिळ्त नाही, परंतु त्यांच्या साहित्यावरुन एवढे मात्र दिसून येते की, त्यांच्यावर अगदी लहानपणापासून जैन धर्माचा विशेष प्रभाव पडला होता व त्याचा परिणाम म्हणून त्यांनी राज्यवैभवाच्या लवकरच त्याग केला आणि अतिशय कठीण् अशा निर्ग्रथ मुनिदीक्षेचा स्वीकार केला.  या मुनिअवस्थेतच त्यांच्याकडून जैन शासनाच्या दृष्टिकोनातून असामान्य कार्य झाल्याने जैनांच्या मूलसंघ आचार्यपरंपरेतील एक प्रधान, आचार्य असा त्यांच्याविषयीचा उल्लेख नेहमी केला जातो.

त्यांच्या गुणांचा विचार करताना असे दिसून येते की, अनेक दुर्मिळ गुणांचा समूच्चय त्यांच्यामध्ये झाला होता, म्हणून श्रवण बेळगोळच्या शिलादेखात गुणतो गणीश: या विशेघणाने त्यांचाउल्लेख करण्यात आला आहे.  तसेच ते समंतात भद्र: म्हणजे अंतबाहय अशा सर्व दृष्टिकोनांतून भद्रस्वरुपी होते. भद्र हा शब्द कल्याण, मंगल, शुभ, प्रसन्न, मनोज्ञ आदी अर्थानी वापरला जातो.  समंतभद्र हे भद्रवाक् भद्रदर्शन भद्राकृती व भद्रव्यवहारी होते.  तसेच ते भद्रपरिणामीदेखील होते.  प्रकर्ष पावलेलया या भद्र गोष्टींच्या प्रभावामुळेच त्यांना दीक्षासमयी समंतभद्र हे नाव देण्यात आले असावे असे वाटते.  अर्थात गुणप्रत्यय स्वरुपाचे हे नावत्यांनी अतिशय सार्थ करुन दाखविले.

आचार्य समंतभद्र हे मोठे योगी, तपस्वी, साहित्यिक व तत्वज्ञानी होते.  जैनशास्त्रप्रणीत दिगंबर मुनिजीवनाच्या कठीण नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता ते सदैव घेत असत. ते स्वत: धर्माध्ययन व धर्मध्यान यांमध्ये नेहमी मग्न असत, पण त्यावबरोबर सामान्य जनांचे अज्ञान दूर करुन व त्यांना सन्मार्गावर आणून धर्माचरणात स्थिर करण्याचे अवघड कामदेखील ते तन्मयतेने पार पाडीत.  त्यांची लोकहिताची व चारित्र्यशुद्वतेची दृष्टी विशेष वाखाणण्यासारखी होती. जैनसिद्वांताचे ते गाढे व्यासंगी व मर्मज्ञ विद्वान होूते.  त्यांनी लिहिलेले, रत्नकरंड-श्रावकाचार, आत्ममीमांसा किंवा देवागम, युक्त्यनुशासन, स्वयंभू स्तोत्र आणि स्तुतिविद्याहे पाच अप्रतिम ग्रंथ सध्या उपलब्ध्ं आहेत, पण षट्खंडागम टीका, कर्मप्राभृतटीका, गंधहस्ती महाभाष्य,

जीवसिद्वी व तत्तवानुशासन हे इतर पाच ग्रंथ अजून मिळत नाहीत. स्वतंत्र साहित्यनिर्मितीबरोबरच ते तर्क व्याकरण, छंद अलंकार काव्य, कोश इत्यादी विषयांतही निष्णात होते. संस्कृत साहित्यातील त्यांची असाधारण योग्यता आता सर्वमान्य झाली आहे. स्तुतिविद्या या त्यांच्या एका ग्रंथावरुनदेखील त्यांच्या अद्रितीय शब्द सामर्थ्याची सहज कल्पना येते. त्यांचे आजवरचे सर्व ग्रंथ संस्कृत भाषेतीलच आहेत. इतर भाषांतील त्यांचे ग्रंथ अजून उपलब्ध झाले नाहीत. असे असले तरी त्यांचे चिरस्मरणीय स्वरुपाचे लोन संस्कृत भाषेतच झाले आहे. किंब्रहूना दक्षिण भारतात संस्कृत भाषेला महत्व मिळवून देण्याचे प्रशसनीय कार्य त्यांनी अतिशय समर्थपणे पार पाडले. म्हणून संस्कृत साहित्याच्या इतिहासात एका नवीन युगाचा प्रारंभ त्यांच्यापासून झाला असे मानण्यात येते.

आचार्य समंतभद्र यांच्याया दुर्मिळ साहित्यगुणाचा प्रभाव त्यांच्यानंतरच्या आचार्यवर कित्येंक शतकांपर्यत फार मोठया प्रमाणात पडलेला आढळून येतो. इसवी सनाच्या १० व्या शताकातील प्रसिद्व आचार्य जिनसेन यांनी समंतभद्राजवळील कवित्व, गमकत्व, वादित्व व वागित्व या चार गुणाची विशेष वाखाणणी केली असून ते त्यांच्या साहित्यक्षेत्रातील कीर्तीला चूडामणी रत्ना ची यथार्थ उपमा देतात. यासंबंधी आपल्या महापूराण ग्रंथात आचार्य जिनसेन यांनी-

कवीनां गमकानां च वादिनां वागिनामपि॑

यशः सामंतभद्रीयं मूर्ध्नि मूडामणीयते॑

असा गौरवपुर्वक उल्लेख केला आहे. तसेच अकराव्या शतकातील महाकवी वादिराजसूरी, शुभचंदाचार्य, अजितसेनाचार्य आदी आचार्यानी समंतभद्राच्या गुणांचा गौरव आपापल्या ग्रंथात मोठया आदरभावाने केला आहे, शिवाय श्रवणबेळगोळच्या १३ व्या शतकातील १०५ क्रमांकाच्या शिलालेखात त्यांच्या कार्याची आणि गुणांची स्तुती केली आहे. या सर्व गोष्टीवरुन जेन साहित्यिकांच्या परंपरेत त्यांचे स्थान किती असामान्य होते, याची कल्पना येते.

या सर्व गुणसमुच्चयामुळे स्वामी समतभद्र यांचे व्यक्तिमत्व अगदी असाधारण बनले होते. त्यांनी आपल्या व्यक्तित्वाचे दहा पैलू दहा विशेषणांनी फार चांगल्या प्रकारे स्पष्ट केले आहेत. ते स्वत: विषयी म्हणतात(

आचार्योऽहं कविरहमहं वादिराट् पंडितोऽहं॑

दैवज्ञोऽहं भिषगहमहं मांत्रिकस्तांत्रिकोsgé॑ !!

राजत्रस्यां जलधिवलया मेखलायामिलायां

आज्ञासिद्ध: किमिति बहुना सिद्वसारस्वतोऽहम्

याचा अर्थअसा की,स्वामी समंतभद्र यांनाआचार्य, कवी, वादिराट्, पंडित, दैवज्ञ, भिषक् मांत्रिक, तांत्रिक, आज्ञासिद्व व सिद्वसारस्वत अशा दहा पदव्या होत्या.

स्वामी समंतभद्र यांच्या या दहा विशेषणांमध्ये वादिराट् म्हणजे महावादी हे विशेषणांमध्ये वादिराट म्हणजे महावादी हे विशेषण फार महत्वपूर्ण आहे, कारण आपल्या अपूर्व वादविवादकौशल्याने त्यांनी इतरांच्या मतांचे सयुक्ति खंडन करुन जैन धर्माच्या प्रसाराला फार मोझ हातभार लावला आहे. तत्कालीन तद्वतीप्रमाणे पंडितांच्या गावी जाऊन व भेरीताडन करुन त्यांना वादासाठी ते जाहीर आव्हान देत असत. अशा वादसभांसाठी बिहार, पंजाब, सिंध, माळ्वा, महाराष्ट्र, व कर्नाटक या दूरदूरच्या भागांत त्यांनी विहार केला होता. त्यांची वादात भाग घेण्याची पद्वत स्याद्वाद या जैन विचारप्रणालीवर आधारलेली असल्याने तिला स्याद्वाद विवेचन-पद्वती असे नाव पडले. पद्वतीत स्वामी समुंतभद्र पारंगत असल्याने त्यांना स्याद्वाद-विद्यागुरु असे लोक म्हणू लागले. तसेच जैन धर्माच्या या प्रभावी प्रचारामुहे त्यांचा जिनशासनप्रणेता असा गौरवपूर्ण उल्लेख होऊ लागला.

अशा रीतीने आचार्य समंतभद्र यांच्या गुणाचा व कर्तृत्वाचा प्रभाव फार मोठा होता. याचा प्रत्यय वच: समंतभद्रस्य वीरस्येव विजृम्भते या ८०० वर्षानंतर झालेलया आचार्य जिनसेनांच्या विधानात येतो. त्यांच्या मते, आचार्य समतंभद्रांचे वचन हे भगवान महावीरांच्या वचनासारखे आहे. यामुळेच आचार्य समतभद्रांच्यचा साहित्याला समंतभद्र-भारती असे वैशिष्टयपूर्ण व प्रतिष्ठेचे नाव मिळाले आहे. तसेच समंतभद्राचे हे साहित्य इतके महत्वाचे आहे की, त्यावर अकलंक व विद्यानंद या मुनिश्रेष्ठांनी भाष्य व टीकाग्रंथ यांची रचना केली आहे. तेव्हा या सर्व गुणामुळे व कार्यामुळे आचार्य समंतभद्र यांना स्वामी या पदाने लोक संबोधू लागले आणि त्यांना स्वामी हे केव्ळ एकच विशेषण लावण्याची प्रथा आजतागायत रुढ आहे. साहजिकच स्वामी या शब्दावरुनच आचार्य समंतभद्राची प्रतिष्ठा व महत्ता प्रकट होते.

॑ २९॑

दिगंबर जैन मुनींचे कार्य: एक दृष्टिक्षेप

(सन्मतीच्या रजत महोत्सवानिमित्व एक धावता दृष्टिक्षेप- संपादक)

मुनि-परंपरा व पुररुज्जीवन

जैनसंसकृती सर्वतोपरी समृद्धः करण्यास व तिचे सातत्य अव्याहतपणे चालू ठेवण्यास ज्या गोष्टी कारणीभूत झाल्या, त्यांमध्ये जैन मुनींची उज्जवल परंपरा व त्यांनी केलेले बहुविध स्वरुपाचे मौलिक कार्य या गोष्टींना फार महत्वाचे स्थान आहे. दक्षिण् भारतात इसवी सनापूर्वीच्या तिस-या शतकात श्रुतकेवली भद्रबाहू यांच्यापासून सुरु
झालेली दिगंबर जैन मुनींची प्रभावी परंपरा कित्येकशतकेअखंडपणे चालू होती, हे जैन समाजाचे

मोठे भाग्य होय. या परंपरेतील दिगंबर जैन आचार्य अतिशय गुणवान व चारित्र्यसंपन्न होते. त्यांनीआपल्या निर्गथ अवस्थेतील तपाचरणाचे अत्यंत काटेकोरपणे पालन करुन लोकंपुढे धार्मिक जीवानाचा एक आदर्श निर्माण केला. तसेच वर्षातील चातुर्मासाचा काल सोडून इतर वेळी पायी चालत जाऊनसर्वत्र अखंड बिहार केला आणि गृहस्थाश्रमी लोकांना, श्रावक व श्राविका यांना धर्मप्रणीत आचारण करण्यास उद्युक्त केले. त्याचप्रमाणे या जैन मुनींनी स्वतःची विद्वत्ता वाढविली आणि धार्मिक वाङःमयात मोलाची भर घातली, इतकेच नव्हे तर विविध शास्त्रीय विषयांवर विपूल ग्रंथरचना करुन ज्ञानसंरक्षण वनसंवर्धन करण्यात मोठा व हातभार लावला. विशेषत: ही सर्व ग्रंथसंपदा त्यांनी प्राकृत व संस्कृत या विद्वनमान्य भाषाबरोबरच कानडी, तेलूगू व तमिळ यासारख्या प्रादेशिक भाषामधून करुन ज्ञानाचे लोण सामान्य लोकांपर्यंत प्रथम पोहचविण्याचे श्रेय मिळविले आणि त्या भाषांना मानाचे स्थान मिळवून दिले. किंबहुना जैन मुनींच्या अविरत व महत्वपूर्ण साहित्यसेवेमुळेच या प्रादेशिक भाषांना ग्रांथिक भांषांचे स्वरुप प्राप्त झाले. आा रीतीने दिंगबर जैन मुनीननी धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य निरलसपणे व सातत्याने करुन जनमानसावर विशाल प्रभ्ांव पाडला आणि सामान्य लोकांचे`जीवन उन्नत करण्यामध्ये मोठे यश संपादन केले.

अशा या प्रभावशाली मुनिपंरपरेवर मुसलमानी अमलापासून मात्र मोठे आघात होण्यास सुरुवात झाली.  मुनीनां आणि विशेषत: निर्ग्रथ मुनींना मोकळेपणाने सर्वत्र विहार करणे अत्यंत कठीण् होऊन बसले. तसेच आपली साहित्यनिर्मिती चालू ठेवणे, लोकांमध्ये धर्म जागृति करणे, शिक्षणप्रसाराला उत्तेजन देणे, सांस्कृतिक उपक्रमांना चाला देणे इत्यादी उपयुक्त कार्ये करणे त्यांना अशक्यप्राय होऊन बसले.  साहजिकच निर्ग्रथ जैन मुनींच्या संस्थेला व प्रभावाला उतरती कळा लागली आणि परिमामत:  मुसलमानी अमलामध्ये निर्ग्रथ मुनींची परंपरा प्राय: नामशेष झाली. ब्रिटीश अंमल सुरु होईपर्यत या अवस्थेत काही बदल झ्ंाला नाही.  ब्रिटीश अमदानीत लोकांना धार्मिक स्वातंत्र्य मिळू लागले आणि त्यामुळे लोकांना आपापल्या धर्मापमाणे आचारण करण्यास पूर्ण मोकळीलक मिळाली.  याचा चांगला परिणाम जैनधर्मीय लोकांबरही झाली आणि त्यांचा आपल्या धर्माप्रमाणे आचारण करण्याकडे कल वाढू लागला.  अशा प्रकारे जैन श्रावकांच्या धर्माचरणाच्या परिस्थितीत फरक पडला तरी त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी जैन मुनी अतिश्ंय थोडे होते आणि निर्ग्रथ जैन मुनीनंची परंपरा तर खंडितच झाली होती. इसवी सनाच्या एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून मात्र आचार्य श्री शांतिसागर महाराज यांनी निर्ग्रथ मुनिपरंपरेचे पुनरुज्जीवन केले.

आचार्य श्री शांतिसागर महाराज   ( इ. स. १८७३ ते १९५५ )

वंदनीय आचार्य श्री शांतिसागर महाराज यांनी इ. स. १९२० सी निर्ग्रथ मुनिदीक्षा घेतली. या घटनेला जैनांच्या आधुनिक काळातील इतिहासामध्ये अतिशय महत्व आहे, कारण या निर्ग्रथ दीक्षेमुळे कित्येक शतके खंडित झालेली निर्ग्रथ जैनमुनीची परंपरा परत सुरु झाली.  तसेच या निर्ग्रथ दीक्षेमुळे जैन धर्माने घालून दिलेल्या अतिशय कडक आचारनियमांप्रमाणे वर्तन करुन निर्ग्रथ मुनीचे जीवन विसाव्या शतकातदेखील सहजपणे व्यतीत करता येते, हे सिद्व झाले.

आचार्य श्री शांतिसागर महाराज यांनी निर्ग्रथ मुनिपदाचे पुनरुज्जीवन केले, एवढेच नव्हे तर त्या पदाला सर्व समाजात मोठे मानाचे स्थान मिळ्वून दिले. त्यांनी स्वत:च्या निष्कलंक

आचरणाने निर्ग्रथ जीवनाचा एक आदर्श निर्माण केला आणि श्रावकाना साधु-दीक्षा घेण्यास उद्ययुक्त केले. त्याप्रमाणे अनेक श्रावक व श्रावीका यांनी यतिजीवनाचा मार्ग आनंदाने पत्करला आणि ते मुनी आर्जिका या स्वरुपात लोकांना धर्मोपदेश देण्याचे आवश्यक कर्य करु लागले. असे साधु व आर्जिका यांचा मुनीसंघ निर्माण झाला आणि त्या संघाचे आचार्यपद श्री शांतिसागर महाराजांकडे आले. अशा प्रकारे कित्येंक शतकानंतर एका निर्ग्रथ आचार्याच्या अधिपत्याखाली मुनिसंघ् अस्तित्वात आला. आचार्य शांतिसागर महाराज यांनी केवळ मुनिसंघ स्थापन केला, इतकेच नव्हे तर त्या संघाला स्वत:च्या काटेकोर वर्तनाने व कुशल नेतुत्वाने सर्व लोकांमध्ये मोठी प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांनी आपल्या संघासह उत्तर भारतात बिहार करावयास प्रारंभ केला आणि यामुळे तिकडील जैन लोकांमध्ये अभूतपूर्व चैतन्य निर्माण झाले, कारणं् आचार्यश्रींच्या रुपाने त्यांना अनेक शतकांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर अदर्श निर्ग्रथ दिगंबर मुनींचे दर्शन घेण्याचे भाग्य लाभले. तसे सर्व तीर्थक्षेत्राची वंदना करण्यासाठी आचार्यश्रीनी आपल्या विशाल संघासह भारताच्या विविध भागातून आणि पूर्वीचे ब्रिटीश प्रांत आणि हिदी संस्थाने यांच्या प्रदेशातुन सतत बिहार करुन ग्रिंथ जैन मुनीनंचा अनिर्बधपणे कुठेही बिहार करण्याचा अधिकार प्रस्थापित केला. अर्थात हे कार्य अतिशय अवघड व घोक्याचे होते, परंतु सर्व संकटातून धैर्याने व शांत चित्ताने तोंड देऊन आचार्यश्रीनी हिंछू राजांच्याप्रमाणे मुसलमानी राजांच्या संस्थानी प्रदेशांतदेखील बिहार करण्यात मोठे यश मिळवीले.

निर्ग्रथ मुनिपदाची प्रतिष्ठा वाढविण्याबरोबरच श्रावकांमध्ये धर्मजागृती करण्याचे कठीणं् कार्यदेखील आचार्य शांतिसागर महाराज यांनी अत्यंत निष्ठेने पार पाडले.त्या काळी सामान्य जैन लोकांमध्ये प्रचलित असलेलया कुरुढी, अंधश्रद्दा व आगमाविरुद्व चालीरीती यांचा त्याग करण्यास आचार्यानी लोकांना प्रवृत्त केले. त्यांच्या प्रयत्नामुळेच जैन लोकांबरील अन्यधर्माचे वर्चस्व व मिथ्यात्वाचा पगडा कमी झाला. जैनांना जैन धर्माप्रमाणे वागावयास लावण्याचे हे कार्यदेखील अत्यंत अवघड होते, कारण मध्ययुगीन कालामध्ये जैन संस्काराचा व विधिनियंमाचा जवळजवळ लोप झ्ाला होता. तेव्हा जैनांना जैन धर्माची ओळख करुन देऊनत्यांना धर्मप्रणीत आचारण करण्यास उद्युक्त करण्याचे बहुमोल कार्य करुन, त्याद्वारे धर्मप्रभ्ांव सर्वत्र वाढविण्याचा शुभारंभ त्यांनीकेला. त्यासाठी जिनवाणी जीर्णोद्वारक संघ यासारख्या अनेक उपयुक्त संस्था कार्यान्वित

केल्या,  तसेच जेन धर्म व संस्कृती  यांवर होणा-या इतरांच्या आक्रमणांना निर्धाराने व प्रसंगी आपले प्राण पणाला लावून सातत्याने विरोध केला. जैन धर्म ही हिदू धर्माची शाखा नसून तो एक स्वतत्र धर्म आहे, हे सत्य भ्ंारताच्या राज्यशासनाकडून प्रस्थापित करुन घेतले.  अशा रीतीने आचार्यश्रीनी युगप्रवर्तक स्वरुपाचे कार्य करुन विसाव्या शतकाच्या मध्यापर्यत जैन लोकांमध्ये अभूतपूर्व अशी धर्मजागृती केली.  त्यांनी आयुष्यभर धर्मप्रणीत व्रतांचे काटेकोरपणे पालन केले आिा शेवटी धर्माने घालून दिलेलया सर्वश्रेष्ठ सल्लेखना व्रतानुसार १९५५ साली समाधिमरण स्वीकारले. अशा रीतीने आचार्य शांतिसागर महाराजांनी जैन धर्म् हा एक जिवंत धर्म आहे, हे सर्व जगाला पडवून दिले.

आधुनिक कालातील जैन संस्कृतीच्या इतिहासाला कलाटणी देणारे आचार्यश्री शांतिसागर महाराजांचे हे कार्य जोमाने पुढे चालविण्याचे व समृद्व करण्याचे महत्वपूर्ण कार्य गुरुदेव श्री समंतभद्र महाराज, आचार्यरत्न श्री देशभूषण महाराज व उपाध्याय मुनिश्री विद्यानंद महाराज अदी अनेक मुनिगण् अत्यंत समर्थपणे आजतागायत पार पाडीत आहेत, ही विशेष समाधानाची व भाग्याची गोष्ट होय.  त्यांचे दूरदर्शी मार्गदर्शन व अविरत परिश्रम यांमुळे जैन समाजाचा धार्मिक व सांस्कृतिकदृष्टया कायापालट झाला आहे व ती प्रक्रिया अजून चालू आहे.

गुरुदेव समंतभद्र महाराज  ( जन्म १९-१२-१८९१)

आचाय्र शांतिसागर महाराजयांनी पुनरुज्जीवित केलेलया लोकांच्या जैन धर्मावरीली श्रद्वेला अधिक डोळस व दृढ करण्याचे कार्य व तिला ज्ञानाचे अधिष्ठान देण्याचे कार्य गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांनी आपल्या मुनिजीवनाच्याही अगोदरपासून सुरु केले आणि ते अव्याहतपणे चालू ठेवलेआहे.  त्यांनी मूलांच्या मनावर लहानपणापासून होणा-या संस्कारांचे महत्व अचूक हेरले आणि असे स्ंस्कार नियोजनपूर्वक व सातत्याने करण्यासाठी प्राचीन आश्रम किंवा गुरुकुल पद्वतीच्या शिक्षणक्रमाचा पुरस्कार केला. तसेच धार्मिक व लौकिक शिक्षण् यांचा मिलाफ जीवनास अतिशय उपयुक्त ठरतो. हे सत्य त्यांनी जाणले आणि त्यानुसार गुरुकुलांमध्ये दोन्ही प्रकारचे शिक्षण देयावरत्यांनीभर दिला.  या नवीन स्वरुपाच्या शिक्षणविष्ंयक विचारांना मूर्त रुप देण्यासाठी

गुरुदेव समंतभद्र महाराज यांनी गुरुकुल स्थापनेचे आद्यकाय्र (**Pioneering work**) हाती घेतले. त्यांनी १९१८ साली जैनांच्यासांस्कृतिक इतिहासात महत्वपूर्ण स्थान असलेल्या कारंजा जि. अकोला-विदर्भ) यागावाी श्री महावीर ब्रहयचर्यारम (गुरुकुल) या संस्थेची स्थ्ापना केली आाि त्याच धर्तीवर श्री १०८ बाहुबली मुनिमहाराजयांच्या वास्तव्याने पुनीतझ्ंालेलया व अतिशय क्षेत्र् असलेलया डांगर कुशीतील बहुबली ( ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) या ठिकाणी श्री बाहुबली ब्रहयचर्याश्रम (गुरुकुल) या संस्थेची दिनाकं १३-७-१९३४ रोजी स्थापना केली. त्यांतरभ्ंरतात विविध ठिकाणी अशा त-हेच्या ९ गुरुकुलांची स्थ्ंापनात्यांनी केली. गुरुदेव समंतभद्र महाराजांनी आधुनिक काळात गुरुकुलांचा नवीन उपक्रम सुरु करुन जैन समाजात एक प्रकारची क्रांती घडवून आणली. या गुरुगुलांमुळे शेकडो गरीब विद्यार्थ्याना मोफत शिक्ष्ंणाची सोय उपलब्ध्ं झाली, धार्मिक शिक्ष्ंण्ंाचा प्रसार झाला, नवीन कार्यकर्ते व नेते निर्माण झ्ंले आणि जैन संस्कृती बद्लचा लोकांचा आदर वृद्धिंगत झाला. अशा रीतीने जैंनाच्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे वैशिष्टयपूर्ण कार्य गुरुदेव समंतभद्र महाराजांनी निष्ठेने पार पाडले.

अतिश्ंय क्षेत्र बाहुबलीचा रम्य डोंगर ही आपली कर्मभूमी व तपोभूपी निवडून तिथे विविध शैक्षणिक सोयी उपलब्ध करुन श्री बाहुबली ब्रहयचर्याश्रम या संस्थेस श्री बाहुबली विद्यापीठ या विशाल व व्यापक संस्थेची जोड देऊन संस्मरणीय अशी प्रगती केली. एवढेच नव्हे तर इथै अनेक धार्मिक वास्तु निर्माण करुन व धार्मिक उपक्रम सुरु करुन त्यांनी बाहुबलीच्या परिसराला मोठया पवित्र क्षेत्राचे स्वरुप व महत्व प्रापत करुन दिले. पवित्र बाहुबली डोंगराच्या पायथ्याशी भगवान बाहुबलीचे प्रशस्त मंदिर, शुभ संगमरवरी पाषाण्ंाचा ४१फुट उंच मानस्तभ, त्यावरील चतुर्मुख मनोज्ञ मूर्ती, तीर्थकराच्या धर्मोपदेशसभेचे प्रतीकात्मक दर्शन घडविण्ंारे श्री महावीर समवसरण मंदिर, आचार्य कुंदकुंदाचे महान ग्रंथ, भिंतीवरील पाषणावर उत्कीर्ण केले श्री कुंदकुंद आगममंदिर हस्तलिखित व मुद्रित अशा अनेक धार्मिक ग्रंथाचा संग्रह असलेले श्री सरस्वती मंदिर, श्री पंचमेरु पर्वत, नंदीश्वर द्वीप व गंधकुटी यांच्या आकर्षक प्रतिकृती शुभ्र संगमरबरी पाषाणाची २८ फुअ उंचीची आतिश्ंय मनोज्ञ अशी भगवान बाहुबलीची बूहन्मूर्ती, मूर्तीच्या जवहच बसविलेले जिनभक्त गोमटी देवी व सुप्रसिद्व जैनसेनापती चामुंडराय याचे कलापूर्ण बैठे पुतळे, बाधीण व गाय एका पात्रात जलपान करीत आहेत असे दृश्य दाखविणारे आदर्श अहिंसा-धर्माचे बोधपुर्ण प्रतीक,

बृहन्मूर्तीच्या मागील बाजूस श्री मांगीतुंगी मुक्तागिरी गजपंथ, तारंगा, सोनागिरी व पावागिरी या सहा पवित्र सिद्वेक्षेत्राच्यालहान प्रतिकृती बृहन्मूर्तीच्या उजव्या बाहूस तीर्थराज श्री सम्मेदशिखरजीची प्रतिकृती उाव्या बाजुस  राजपुत्र श्री नेमिनाथ यांची विवाहपूर्व मिरवणूक दाखविण्ंारी मुर्तिमंत प्रतिकृती, तिच्यावर श्री सिद्वक्षेत्र गिरनारची उदबोधक प्रतिकृती, तीर्थकर भगवान श्री वासुपूज्य व श्री महावीर यांच्या अनुक्रमे चंपापुरी व पावापुरी या मोक्षस्थानाच्या हुबेहुब प्रतिकृती तीर्थकर भगवान श्री शांतिनाथ, कुथुनाथ व अरहनाथ् यांचे दर्शन घडविणारे टुमदार रत्नत्रय मंदिर, आचार्य श्री शांतिसागर महाराजाच्या चरणपाछुका रत्नत्र्ंय सागर संशोधन प्रवचन मंदिर या नावाचा भव्य सभामंडप आदी विविधतापूर्ण सांसकृतिक वास्तु एकत्र आढळून येतात.

असा अत्यंत रमणीय व शुभभ्ंावपरिपोषक परिसर निर्माण करण्याची प्रेरणा देऊन व त्याप्रमाणे कामे व्यवस्थित पार पडून गुरुदेव समंतभद्र महाराजांनी जैन संस्कृतीचे एकत्रित देर्शन मिळण्याची अपूर्व सोय भ्ंारतात सर्व जनतेला प्रृथमच उपलब्ध करुन दिली, तयामुळे भारतवर्षात जैनांचे या समचि हे असे अत्यंत वैशिष्टयपूर्ण क्षेत्र निर्माण करुन त्यांनी पुढील कित्येक शतकेजैन संस्कृतीचा परिचय लोकांना होत राहील, अशी तजवीज करुन ठेवली आहे.  विशेष म्हणजे भ्ंारतातील कोणत्याही प्रदेशापेक्ष्ंा जास्त जैनसंख्या असलेलया या दख्खानच्या भूमीत या अभूतपर्व क्षेत्राची स्थापना व अभिवृद्वी करुन संमतभ्रद महाराजांनी जेनाना जैनत्वामध्ये दीर्घकालपर्यत स्थिर व द,ढ ईैवण्याचा दृष्टीने अत्यंत बहुमोल व उपयुक्त कार्य केले आहे.  तसेच हे कार्य त्याच जोमाने पुढे चालू आहे, ही अतिशय भाग्याची गोष्ट आहे. तेव्हा पूजय समंतभद्र महाराजांनी केलेली, बाहुबली धर्म केंद्रा ची निर्मिती ही जैनांच्या आधुनिक काळाच्या इतिहासातील खास उल्लेखनीय व दुरपरिणामी घटना होय.

आचार्यरत्न देशभूषण महाराज  (जनम: २८ नोव्हेंबर, १९०५)

आचार्य शांतिसागर  महाराज यांनी पुनरुज्जीवित केलेली निर्ग्रथ मुंनीची परंपरा लोकाभिमुख करण्याचे महनीय कार्य आचार्यरत्न देशभूषण महाराज यांनी केले. वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी अत्यंत खडतर अशी निग्रथ मुनिदीक्षा त्यांनी घेतली.  तेव्हापासून दुरदुरच्या ठिकाणी

सारखा विहार करीत सर्व थरांतील लोकांना जैन धर्माची ओळख् करुन देण्याचे आवश्यक कार्य त्यांनी अविरतपणे चालू ठेवले आहे. पूर्ण भ्ंारतात कलकत्ता शहरामध्ये व बंगालच्या दुर्गम प्रदेशामध्ये कित्येक शतकांनतर प्रथमच विहार करणारे देशभूषण महाराजहे पहिले निर्ग्रंथमुनी होत. आतापर्यंत एक लाख मैलांच्या वर पदयात्रेचा विक्रम त्यांनी केला असून, जैन धर्माचा प्रभाव पसरविण्याचे कार्य फार मोठया प्रमाणावर केले आहे. त्यांनी भारतभर जिनमंदिराचा जीर्णोद्वार किंवा नवी रचना करण्यास व बृहन्मूतीची प्रतिष्ठापना करण्यास लोकांना उद्युक्त केले. भारतात सर्वग्त्र विखुरलेलया व दुर्गम प्रदेशात असलेलया प्राचीन तीर्थक्षेत्रांचे संरक्ष्ंण व संवर्धन करण्यास विशेष उत्तेजन दिले. वेळगाव जिल्हयातील स्तवनिधी या प्राचीन तीर्थक्षेत्राची अभिवृध्दी ही त्यांच्या मार्गदर्शनाचेच फल होय. प्राचीन क्षेत्रांच्या विकासाबरोबरच नीवन क्षेत्राच्या निमितीकढेही त्यांनी लक्ष पुरविले आणि त्यांच्या प्रेरणेने राजस्थानात जयपुरजवळ चूलगिरी तसे चिक्कोडी तालुक्यातील कोथळी-कुपानवाडी या त्यांच्या जन्मगावाजवळील उंच पहाडावर भगवान शांतिनाथ् तीर्थकरांची बृहन्मूर्ती असलेले शांतिगिरी नावाचे नवीन तीर्थक्षेत्र अस्तित्वात येत आहे.

आचार्यरत्न देशभुषण् महाराज यांनी तीर्थक्षेत्र अभिवृद्वीच्या उपयुक्त कार्याबरोबरच जैन धर्माचा योग्य परिचय सामान्य लोकांना करुनदेऊन धर्मप्रभावना साधण्यासाठी साहित्यनिर्मितीचे आवश्यक कार्य अव्याहतपणे चालू ठेवले. त्यांनी आजपर्यंत ६० च्या वर लहान-मोठे ग्रंथ जिहून जैन साहित्याची मौलिक सेवा कली आहे. विशेष म्हणजे प्राकृत, संस्कृत व कन्नड या भाषांतील प्राचीन पविन्न ग्रंथाची सुरस, हिंदी, मराठी व गुजराती भाषांतरे करुन प्रादेशिक भाषांतील जैन साहितय समृद्व बनविले आहे. तसेच त्यांच्या परिश्रमामुळे अनेक दुर्मिळ हस्तलिखित जैन ग्रंथ संश्ोधकांना उपलब्ध झाले. शिवाय भ. महावीरांच्या जीवनकार्याचा विस्तृत परिचय करुन देणारा व जैन संस्कृतीचा विविध अंगांचे सखोल विवेचनकरणारा भ. महावीर और उनका तत्वदर्शन नावाचाएक हजाराहून जास्त पृष्ठांचा बृहदग्रंथ लिहून साहित्यक्षेत्रात विशेष संस्मरणीय कामगिरी केली आहे.

भगवान महावीर २५०० वा निर्वाण महोत्सव सर्व जगभर अतिशय भव्य प्रमाणावर साजरा व्हावा म्हणून आचार्यरत्न देशभूषण महाराज यांनी खास प्रयत्न केले. भारत सरकारने शासकीय

पातळीवर निर्वाण महोत्सव वर्ष साजरे करण्याचे ठरविले व त्यासाठी भ्ंारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या अध्यक्षतेखाली मध्यवर्ती समिती स्थापन झाली. तिच्या पहिल्या बैठकीला आचार्यरत्न भारतीय लोकसभेच्या सभागृहामध्ये उपस्थित राहिले. अशा रीतीने आधुनिककालात राजदरवारी उपस्थिती राहणारे देशभूषण महाराज हे पाहिले निर्ग्रंब मुनी होत.

धार्मिक व साहित्यिक कार्याबरोबरच शैक्षणिक कार्याकडेही आचार्यश्रीनी विशेष लक्ष पुरविले. सर्व जनतेमध्ये शिक्षणाचा प्रसार होण्याची नितांत आवश्यकता जाणून त्यांनी शिक्ष्ंणसंस्थाच्या स्थापनेस उत्तेजन दिले त्यांच्या प्रेरणेने कोल्हापूर इथे १९६३ साली श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण्ं प्रसारक मंडळ यासंस्थेची स्थापनाहोऊन कोहापुरात शैक्षणिक कार्याला चालना मिळी. या शिक्ष्ंण्ं मंडळातर्फे सध्या कला व वाणिज्य विभ्ंागाचे श्री महावीर महाविद्यालय सन १९७०पासून चालू आहे. तसेच या मंडळातर्फे दोन माध्यमिक शाळादेखील चांगले कार्य करीत आहेत. विशेष म्हणजे आचार्यरत्न देशभूषण्ं महाराजांच्या मार्गदर्शनाखाली कोथळी गावी देशभूषण ब्रहयचर्यारम ट्रस्ट या संस्थेची स्थापना झाली असून तिच्यामार्फत्त गुरुकुल पद्वतीने लौकीक व धार्मिक शिक्ष्ंण्ं देण्याची उत्तम सोय कर्नाटकातील विद्यार्थ्यासाठी उपलब्ध्ं झाली आहे. या शैक्षणिक उपक्र्मामुळे कनाटकातील जैनांच्या इतिहासामध्ये नवीन पान उघडले गेले, यात शंका नाही.

उपाध्याय मुनिश्री विद्यानंदजी महाराज ( जन्म २२ एप्रिल १९२५ )

आचार्य रत्न देशभूषण महाराजांचे परमशिष्यं मुनिश्री विद्यानंद महाराज यांनी आचार्य शांतिसागर महाराजांनी सुरु क्ेलेल्या जैन धर्मप्रभावनेच्या कार्याची गती व व्याप्ती वाढविण्यात आपले जीवनसर्वस्व वेचले असून या कामात त्यांनी अभूतपूर्व यश संपादन क्ेले आहे. पारंपरिकता व आधुनिकता यांचा सुरेख संगम म्हणजे मुनिश्री विद्यानंद महाराज होत आणि असा संगम क्वचितच पाहवयास मिळ्तो. वालब्रहयचारी अवस्थेत सन १९४६ साली साधुजीवनात प्रवेश क्ेलेलया विद्यानंदजीनी दि. २५जुलै,१९६३ रोजी दिल्ली मुक्कामी आचार्यरत्न देशभूषण महाराजांकडून निर्ग्रथ मुनिदीक्षा घेतलयानंतर आपल्या अंगीकृत धर्मप्रभावनेच्या कार्याला

वैशिष्टयपूर्ण रीतीने चालना द्यावयास सुरुवात केली. निर्ग्रंथ मुनिचयेचे विधिवत पालन करीत धर्मोपदेश देण्यासाठी पश्चिम व उत्तर भारताच्या मोठया शहरांतुन व हान गावांतून विहारकेला. भारताच्या त्याभागातील ग्रामीण जनतेपर्यत जाऊन धर्मोपदेश देणारे ते आधुनिक काळातील पहिले निर्ग्रंथ मुनीहोत. तसेच मे, १९७० मध्ये हिमालय पर्वताच्या १२,३०० फुट उंची वरच्या बद्रीनाथ पलीकडचा माण गावाजवळील उत्तुंग शिखरापर्यत पदयात्र्ा करणारे ते आधुनिक काळातील पाहिले निर्ग्रंथ मुनी होत. हिमायातीलबर्फमय पदेशातदेखील मनोनिग्रहाच्या बलावर निर्ग्रंथ मुनिजीवन व्यतीत करता येते, हे त्यांनी स्वत:च्या उदाहरणाने जगाला दाखवून दिले. शिवाय श्रीनगर या काश्म्ीरच्या राजधातीन वर्षायोग अथ्ंवाचातुर्मास करणारे ते आधुनिक काळातील पाहिले मुनिश्री होत. विद्यानंद महाराजांच्या या अपूर्व विहारामुळे हिमालयापर्यतच्या सर्व उत्त्र भ्ंारताच्या प्रदेशामध्ये जैन धर्माचा व निर्ग्रंथ मुनिजीवनाचा फार मोठा प्रभाव पछला, म्हणून विद्यानंद महाराजांच्या हिमालय-विहाराला व श्रीनगर चातुर्मासाला ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले आहे.

आपल्या प्रदीर्घ विहारातून त्यांनी केलेलया जेन धर्माचा झंझावती प्रचार अत्यंत प्रभावीव फलदायी ठरला आहे. विशेष म्हणजेतयांनीहा प्रचार जैन व जैनेतर या सर्व लोकांसाठी केला आणि त्याकरिता प्रचारयंत्रेणेच्या विविध आधुनिक साधनांचा त्यांनी अत्यंत कुशलतेने व समर्पकपणे उपयोग केला. किंब्हुना प्रसार साधनाचा असा योग्य उपयोग करुनघेणारे हे पाहिले निर्ग्रंथ मुनी होत. प्रसन्न व्यक्तिमत्व, प्रगाढ विद्वत्ता प्रभ्ंावी वक्तृत्व, प्रबुद्वप्रवचन शैली, असामन्य भ्ंाषाप्रभत्व धीरगंभीर आवाज, पुरागामी विचारसरणी, प्रख्ंर राष्ट्राभिमान जैन धर्म वास्तविक विश्वधर्म आहे ही कहाटय श्रद्वा, त्यामुळे अशा सर्वोपकारी विश्वधर्मावद्ल नितांत आदर आदी गुणसमुच्चयामुळे मुनिश्री विद्यानंद महाराज यांची प्रवचेने अतिशय लोकप्रिय व कमालीची परिामकारक ठरली आहेत. त्यांच्या प्रवचनांा नित्यश: जमणारा हजारोचा अफाट जनसमुदाय हा सर्वधर्मीय असतो. या प्रवचनांतुन जैन धर्म हा विशिष्ट लोकांसाठी नसूनतो या विश्वातील सर्व प्राणिमात्रांसाठी असल्याने जैन धर्माला विश्वधर्म समजले पाहिजे, असे मत ते पुराव्यानिशी लोकांना पटवून देतात. तसेच जैन संस्कृती ही भारतातील जैन संस्कृतीने फार मोठे योगदान केले आहे, हे विचारदेखील आपल्या प्रवचनांतून ते लोकांना समजावून देतात, म्हणून त्यांना विश्वधर्मप्रेरक व राष्ट्रसंत ही बहुमानदर्शक विशेषणे नेहमी लावण्यात येतात.

प्रभावी प्रचारकम्हणून नव्हे तर साहित्याच्या क्षेत्रात लेख्क व संशोधक म्हणून देखील मुनिश्री विद्यांनंद महाराजयांनी पर्याप्त ख्याती प्रापत केली आहे. आगमग्रंथ व धर्मविषयक इतर ग्रंथ यांचे सखोल अध्ययन, चिंतन व मनन करणे हेत्यांच्या व्यक्तिमत्वाचे अविभाज्य अंग बनले आहे. तसेच जगातील आधुनिक तत्वज्ञ व विचारवंत यांच्या गं्रथाचे वाचन व त्यांच्या मतांचे आकलनकरणे हा मुनिश्रींचा नित्यक्रम झाला आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनात सर्वसंग्राहकता, भारदस्तपणा व समन्वयदृष्टी हे गुण प्रकर्षाने आढळून येतात. मुनिश्री विद्यानंद महाराज यांचे सन १९७३ अखेर २७ग्रंथ प्रसिद्व झं्रालेआणि त्यांच्या मार्गदर्शनाख्ंाली १९ ग्रंथ संकलित करुन प्रसीद्व करण्यात आले. हे सर्व ग्रंथ आधुनिक व उत्कृष्ट स्वरुात प्रसिद्व करण्यात आले ही खास उल्लेखनीय गोष्ट होय. तसेच शास्त्री-पंडितांनाव साहित्यिकांना प्रोत्साहन देऊनत्यांच्याकडून विविध विषयांवर विपूल व मौलिक लेखन करुन घेऊन ते प्रसिद्व करण्याचे महनीय कार्य मुनिश्री विद्यानंद यांनी निष्ठापूर्वक व तन्मयतेने पार पाडले आहे. त्यांच्याच प्रेरणेने व उत्तेजनामुळे जैनसंबंधित विषयांवर संशोधनात्मक प्रबंध, अभ्यासपूर्ण लेख, प्रभावी कादंब-या ललितपूर्ण काव्यग्रंथ आदी मौलिक साहित्य जैन व जैनेतर अभ्यासकांनी अत्यंत परिश्रमपूर्वक निर्माण केले. या सर्व साहित्यनिर्मितीचे परोक्ष श्रेय मुनिश्री विद्यानंद यांनाच दिले पाहिजे.

त्यांनी केवळ साहित्याला उत्तेजन दिले एवढेच नव्हे तर साहित्य निर्माण व करणारे शास्त्री, पंडित, संशोधक व लेखक यांच्याकउे उपेक्षेने राहण्याची समाजाची दृष्टी पार बदलून टाकली. विद्वान लोक हे समाजचे श्रेष्ठ धनअसून संस्कृतीचे सातत्य टिकवून ती समृद्व करण्याचे उपयुक्त कार्य ते एकनिष्ठपणे सदैव पार पाडीत असल्यामुळे समाजने त्यांच्याबदल आदरभ्ंावना ठेवून त्यांना विशेष मानाने वागविले पाहिजे, हा नवा दृष्टिकोन मुनिश्रीनी समाजाला पटवून दिला आणि समाजाने विद्वानांविषयीचे आपले आवश्यक कर्तव्य नित्यश: बजावे पाहिजे, असा आग्रह धरला. परिणामत: मुनिश्रींच्या मार्गदर्शनाखाली वीरनिर्वाण भ्ंारती ही साहित्य सर्जन करणारी संस्था स्थापन झाली आणि त्यामार्फत्त साहित्यक्षेत्रात प्रशंसनीय कार्य केलेलया जैन-जैनतर विद्वानांना वीर भ्ंरती पुरस्कार देऊन त्यांचा विशैष गौर करण्याची प्रथा सुरु झाली. अशा प्रकारे मुनिश्री विद्यानंद महाराज यांनीसाहित्याच्या क्षेत्रात अभूतपूर्व चैतन्य निर्माण केले आहे.

धर्मप्रचार व साहित्य उत्तेजन याकार्याबरोबरच जैन धर्माच्या पंथोपपंथीय अनुयायांमध्ये दृढ ऐक्यभाव निर्माण करण्याचे एंतिहासिक महत्वाचे कार्य पार पाडण्यामध्ये मुनिश्री विद्यानंद यांनी पुढाकारघेऊन बरीच प्रगती करुन दाखविी आहे. या कामासाठी त्यांनी १९७४-७५ या भगवान महावीर २५०० व्या निर्वाण महोत्सव वर्षा या अतिशय चांगला उपयोग करुन घेतला. त्यांच्याच प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली जैनांच्या इतिहासात प्रथमच सर्व जैनांसाठी एक ध्वज, एक ध्वजगीत, एक बोधचिन्ह, एक बोधवाक्य आदीसमानता-प्रस्थापक गोष्टी प्रचारात आल्या. तसेच त्यांच्या प्रोत्साहनामुळेच जैंनाच्या विविध पंथीयाचे आचार्य एकत्र येऊन उपदेश देऊ लागले आणि जैंनामध्ये एकतेची भावना उत्पत्र करु लागले. ही भावना दृढ करण्यासाठी मुनिश्रीनं पुढाकार घेऊन संगीत, नुत्य, नाटय, त्रि, चलतचित्र्, छायाचित्र, आदी कलांच्या माध्यमातून प्रभावी प्रचार करण्यासउत्तेजन दिले. त्यांच्या प्रेरणेमुळेच आकाशवाणीच्या विविध कार्यक्रमातुन जैन संसकृतीचा परिचय लोकांना करुन देण्यात आला. त्यांनी विशैष सहयोग दिल्यामुळे प्रसिद्ध जैन कोषकार जिनेन्द्रवणी हे सर्वपंथीय जैनांनी अधिकृत मानलो समणसुत्त हा अप्रतिम ग्रंथ संकलित करु शकले. शिवाय प्रतयंक प्रवचनातून विविध् धार्मिक कायक्रमामध्ये विशेष सहभागी होण्यास त्यांनी युवकांना व महिलांना उद्युक्त केले. तेव्हा मुनिश्री विद्यानंद महाराज यांनीसमाजध्ये नियोजनपूर्वक परिवर्तन घडवून आणण्याचा उपक्रम सुरु केला आहे आणि या ऐतिहासिक उपक्रमाचा जैन समाजवर इष्ट परिणाम होईल, अशी आशा निम्रण झाली आहे. यासर्वाचा परिपाक म्हूनच गेल्या वर्षी त्यांना मुनि जीवनातील मानाचे असे उपाध्याय पद देऊन समाजाने त्यांचा अभूतपूर्व गौरव केला आहे.

याशिवाय स्व. आचार्यश्री वीरसागर महाराज, स्व. आ. श्री कुंथुसागर म, स्व. आ. श्री पायसागर म, स्व. आ. श्री महावीरकीर्ति म., आ. श्री विमलसागर म., आ. श्री धर्मसागर म., आ. श्री श्रुतसागर म., आ. श्री आदिसागर म., आचार्यक्ल्प श्री सुबल म., मुनिश्री आर्यनंदी म., श्री सिद्वसेन म. आदी अनेक दिगंबर जैनाचार्य व मुनीश्वरांनी समाजच्या धार्मिक, सांसकृतिक व शैक्षणिक विकासात आपापलया परीने मोठेच उत्याहवर्धक व उल्लेखनीय व उल्लेखनीय योगदान दिले आहे. जैन धर्म आणि समाजाचा गौरव त्यामुळे खचितच वाढला आहे, यात शंक नाही. या

सर्वांच्या बहुमोल कार्याचा धावता गोषवारा या एकाच लेखात देता येणे कठीण आहे. यथासमय पुन्हा केव्हातरी तो देता येईल. समाज यासर्व थोर आचार्य व मुनिराजांच्या महान उपकाराबदल आणि समयोजित मार्गदर्शन तथा धर्मप्रभावनेबद्‌ल सदैव कृतज्ञच राहील.

## एलाचार्यश्री विद्यानंद महाराज :
## एक क्रांतिकारी व्यक्तिमत्व

### धर्मप्रभावनेची पंरपरा

भारतात दिगबंर जैन आचार्यची परंपरा अतिशय पुरातन असून तिला भारतीय संस्कृतित अत्यंत मानाचे स्थान आहे. भारताच्या विविध भागांतील दिगंबर जैनआचार्यानी धर्मप्रणीत कठोर आचारण् कोणत्याही परिस्थितीत निरपवादपणे चालू ठेवून, निरंतर सर्वत्र पायी विहार करुन व अखंडपणे सर्वाना धर्मोपदेश देऊन जैन धर्माचे साततय टिकविण्यास महत्वपूर्ण मदत केली. एवढेच नव्हे तर विपूल व उपयुक्त ग्रंथसंपदा प्रचलित प्रादेशिक भाषांतुन निर्माण् करुन वेगवेगळ्या भ्ंषांतीत संस्कृती समृद्व करण्यात अतिशय मोलाची भर घातली. दिगंबर जैन आचार्यच्या कार्याची प्रचीती दक्षिण भ्ंरतात अगदी प्रकर्षाने आढळून येते, कारण या भागात इ. सनापूर्वीच्या काही शतकांपासून आचार्य कुंदकुद उमास्वामी, समंतभद्र, नेमिचंद्र, सोमदेव, वीरसेन, जिनसेन, गुणभद्र यांसारखे विशेष प्रतिभ्ंसंपन्न ग्रंथकार व प्रभावशाली धर्मप्रचारक होऊन गेले, पण प्राचीन काळातील दिगंबर जैन आचार्याची ही उज्जवल परंपरा मध्ययुगीन काळात म्हणजे सामान्यत: इसवी सनाच्या तेराव्या शतकापासून मुसलमानांच्या आक्रमणामुळे व अस्थिर राजकीय परिस्थितीमुळे खंडित झाली. साहजिकच मुसलमान राजांची अनियंत्रित सता असलेल्या या मध्ययुगीन कालखंडात धर्मप्रणीत आचारणाला अतयंत प्रतिकूल परिस्थ्ंिती निर्माण झ्ंाल्याने जैन मुनीची आणि विशेषत: निर्ग्रथ जैन मुनींची संख्या हळूहळू अगदी कमी झाली आणि पर्यायाने त्यांचा लोकांबरील प्रभ्ंावदेखील लुप्त झ्ंाला. जैन धर्म व संस्कृती यांच्या प्रभावनेच्या दृष्टिकोनातून भयावह व खेदजनक असलेली ही परिस्थ्ंिती एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यत थ्ंोडयाफार फरकाने प्रचलित होती.

### आचार्यश्रींचे युगप्रवर्तक कार्य

या परिस्थितीमुळे दीर्घकाळ खंडित झ्ालेली दिगंबर जैन आचार्याची परंपरा विसाव्या शतकाच्या सुरुवातीला थोर निर्ग्रथ प. पू. आचार्यश्री शांतिसागर महाराज (इ. स. १८७३ ते १९५५) यांनी पुन्हा सुरु केली आणि आपल्या धर्मप्रणीत आचारणामुळे ती प्रभावी करुन दाखविली. चारित्रचक्रवर्ती आचार्य श्री शांतिसागर महाराज यांनी स्वतःच्या निष्कलंक आचारणाने निर्ग्रथ जीवनाचा एक आदर्श निर्माण केला आणि श्रावकांना साधु-दीक्षा घेण्यास उद्युक्त केले. त्याप्रमाणे अनेक श्रावक व श्राविका यांनी यतिजीवनाचा मार्ग आनंदाने पत्कारला आणि ते मुनी व आर्यिका या स्वरुपात लोकांना धर्मोपदेश देण्याचे आवश्यक कार्य करु लागले. अशा प्रकारे कित्येक शतकांनंतर एका निर्ग्रथ आचार्याच्या आधिततत्याखाली मुनिसंघ अस्तित्वात आला. निर्ग्रथ मुनिपदाची प्रतिष्ठा वाढविण्याबरोबरच श्रावकांमध्ये धर्मजागृती करण्याचे कठीण कार्यदेखील आचार्य शांतिसागर महाराजानी अत्यंत निष्ठेने पार पाडले. जैनांना जैन धर्माप्रमाणे वागावयास लावण्याचे हे कार्य सुरु करणे अतिशय अवघड होते, कारण मध्ययुगीन कालामध्ये जैन संसकारांचा व विधिनियमांचा जवळजवळ लोप झाला होता. अशा रीतीने आचार्यश्री शांतिसागर महाराजांनी युगप्रवर्तक स्वरुपाचे कार्य करुन विसाव्या मध्यापर्यत जैन लोकांमध्ये अभूतपूर्व अशी धर्मजागृती केली.

आधुनिक काळातील जैन संसकृतीच्या इतिहासाला कलाटणी देणारे प. पू. आचार्यरी शांतिसागर महाराज यांचे हे कार्य जोमाने पुढे चालविण्याचे व समृद्व करण्याचे महत्वपूर्ण कार्य अनेक मुनी अत्यंत समर्थपणे आजतागायत पार पाडीत आहेत, ही विशेष समाधानाची व भाग्याची गोष्ट होय.